# प्रेस नोट दि. ०३/०७/२०२१

## गुन्हे शाखा, युनिट-४, पिंपरी-चिंचवडची कामगिरी

## ०२ वर्षापुर्वी खुन करणाऱ्या आरोपीस अटक

दि.३०/०६/२०२१ रोजी गुन्हे शाखा युनिट-४, चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, प्रसाद गोकुळे यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, पोहवा/ ५१७ दळे, पोहवा/ ९१६ शेटे, पोना/ ११८६ नदाफ, पोशि/२१०२ सैद असे वाकड पोलीस ठाणे हद्दित रेकॉर्डवरील आरोपी चेक करत असताना पो.ना. नदाफ यांना त्यांचे गुप्त बातमिदारामार्फत बातमी मिळाली की, वाकड पोलीस स्टेशनचे अभिलेखावरील रेकॉर्डवरिल एक विधिसंघर्षीत बालक हा दोन वर्षापुर्वीच्या एका खुनाच्या गुन्ह्याचा प्रत्यक्षदर्शी साक्षिदार असुन सदरचा खुन झाल्यानंतर मयताच्या बॉडीची विल्हेवाट लावण्यात आल्याने सदर गुन्ह्याचा प्रकार अद्याप उघडकीस आलेला नाही. त्या अनुशंगाने वर नमुद स्टाफने सदर विधिसंघर्षित बालकाकेडे जावुन त्यास विश्वासात घेवुन त्याचे कडे चौकशी केली असता त्याने सांगितले की, त्याच्या बहिणीचे आरीफ शेख या गुन्हेगाराशी प्रेमसंबंध होते. सदर आरोपी आरीफ शेख हा जानेवारी ते मे २०१९ दरम्यान जेलमध्ये असताना विधिसंघर्षित बालकाची बहिण हि देहुरोड येथील एका पुरुषासोबत मुंबई येते पळुन गेली होती. आरीफ शेख हा जेलमधुन बाहेर आल्यानंतर त्याने मुंबई येथे पळुन गेलेल्या इसमाचा पत्ता माहिती करुन घेणेकरीता त्याचे इतर साथिदारांसह मिळुन मुंबई येथे पळुन गेलेल्या इसमाचे धिरज नावाचे मित्रास जुलै २०१९ दरम्यान जीवानिशी मारुन त्याचा मृतदेह मुळा नदीचे मुंबई बॅगलोर हायवे वरुन मुळा नदिचे पात्रात फेकुन दिला होता व आरीफ याने सदर बालकास झालेला प्रकार कोणास सांगीतला तर तुला जीवे मारीन अशी धमकी दिली होती त्यामुळे त्याने अद्याप पर्यंत खुनाचा प्रकार कोणासही सांगितला नव्हता . आरीफचे इतर साथिदारांबाबत चौकशी केली असता त्याचे इतर साथिदारांची नावे सुरज उर्फ सोन्या जगताप, सागर जगताप, चेतक नेपाळी अशी असल्याचे समजले.

सदर मिळालेली माहिती अतिशय गंभीर स्वरुपाची असल्याने वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रसाद गोकुळे यांनी सदरची माहिती हि सहा. पोलीस आयुक्त गुन्हे व आम्हास कळविली. तेंव्हा आम्ही त्यांना सदर बाबत तात्काळ हालचाली करुन आरोपींचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार वरिल आरोपींचा माहिती काढली असता त्यांची नावे **१) आरीफ सिद्दीक शेख, वय-३२ वर्षे, रा- थेरगाव, पुणे २) सागर सुरेश जगताप, वय-३० वर्षे, रा- थेरगाव, पुणे ३) सुरज उर्फ सोन्या अरविंद जगताप रा- देहुरोड ४)चेतक नेपाळी असे असल्याचे समजले.** तसेच आरोपी क्र. ०१ व ०२ हे सध्या जेलमध्ये असलेबाबत माहिती मिळाली. त्यानंतर आरोपी क्र.०३ याचा शोध घेवुन त्याला देहुरोड परीसरातुन ताब्यात घेण्यात आले. गुन्हे शाखा युनिट ४ येथील अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांचेकडे कसुन चौकशी केली असता त्याने कबुली दिली की, जुलै २०१९ दरम्यान त्याने आरीफ, सागर, चेतक नेपाळी असे चौघांनी मिळुन धिरज नांगर नावाच्या एका इसमास कान्हे फाटा येथुन उचलुन आणले होते व त्यास मुंबई बॅगलोर हायवे वरील भुजबळ चौकानजीक असणाऱ्या चेतक नपाळी काम करत असलेल्या एका भांगाराचे दुकानात नेवुन त्याला दारु पाजुन मारहाण करुन आरीफची प्रेयसी हिला पळवुन नेणाऱ्या इसमाचा पत्ता विचारला असता त्याने तो न सांगितल्याने त्याचा चौघांनी मिळुन गळा दाबुन खुन केला होता. व त्याचा मृतदेह अंगावरील कपडे काढुन फक्त अंडरपॅंट ठेवुन भुजबळ चौकानजीक असणाऱ्या पश्चिम पुर्व वाहत्या मुळा नदीचे पुलावरुन नदीत फेकुन दिला होता. तेंव्हा पश्चिम पुर्व वाहणारे मुळा नदीचे किनाऱ्या लगत सापडलेल्या मृतदेहांसंदर्भात संबंधीत पोलीस स्टेशनचा अभिलेख तपासला असता सांगवी पोलीस स्टेशन हद्दितील पिंपळे निलख विशालनगर नदीपात्रात **ऑगस्ट** २०१९ मध्ये वर नमुद वर्णनाचा मृतदेह सापडला असल्याचे आढळुन आले परंतु त्यावेळी तो मृतदेह संपुर्ण कुजलेला असल्याने त्याची ओळख पटली नसल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर धिरज नांगर याचे नातेवाईकांचा शोध घेवुन त्यांना सदर आकस्मात मयतातील मृतदेहाचे फोटो दाखविले असता त्यांनी तो मृतदेह धिरज नांगर याचाच असल्याचे सांगितले व त्यामुळे ०२ वर्षापुर्वी केलेल्या खुनाचा उलगडा झाला .

सदर ०४ आरोपीं विरुद्ध सांगवी पोलीस स्टेशन येथे **गु.र.नंबर -२१६/२०२१ भा.दं.वि.कलम- ३०२, १२०(ब), २०१, ३४** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास सांगवी पोलीस स्टेशन करीत आहे.

सदर आरोपी हे रेकॉर्ड वरील गुन्हेगार असुन त्यांचे विरुद्ध खुन, खंडणी, जबरी चोरी, मारामारी असे खालील प्रमाणे गुन्हे नोंद आहेत.

**१) आरीफ सिद्दीक शेख, वय-३२ वर्षे, रा- थेरगाव, पुणे एकुण- ०५ गुन्हे दाखल असुन तो सध्या वडगाव मावळ पोलीस स्टेशनकडील खुनाच्या गुन्ह्यात, वाकड पोलीस स्टेशनकडील खंडणीच्या तसेच बुलढाणा**

Scanned with CamScanner

पोलीस स्टेशन कडील बाललैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यांमध्ये सध्या जेलमध्ये आहे.

२) सुरज उर्फ सोन्या अरविंद जगताप वय-३० वर्षे रा- देहुरोड एकुण- २० गुन्हे दाखल असुन तो पुर्वी एका जबरी चोरीच्या गुन्ह्यात ०७ वर्षे शिक्षा भोगुन आलेला आहे.

३) सागर सुरेश जगताप, वय-३० वर्षे, रा- थेरगाव, पुणे एकुण- १२ गुन्हे दाखल असुन तो वाकड पोलीस स्टेशनच्या खंडणीच्या गुन्ह्यात सध्या जेलमध्ये आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त मा. श्री. कृष्ण प्रकाश सो, अपर पोलीस आयुक्त मा. श्री. रामनाथ पोकळे सो, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे मा. सुधीर हिरेमठ सो, सहा. पोलीस आयुक्त, गुन्हे मा. श्री. प्रशांत अमृतकर सो यांचे मार्गदर्शनाखालील गुन्हे शाखा, युनिट-४ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रसाद गोकुळे, सहायक पोलीस निरीक्षक अंबरिष देशमुख, सहायक पोलीस निरीक्षक सिद्धेश बाबर, सहा.पो.उप.नि. धर्मराज आवटे, दादा पवार, नारायण जाधव, पोहवा/ प्रविण दळे, संजय गवारे, अदिनाथ मिसाळ, राहिदास आडे, तुषार शेटे, संतोष असवले, पोना/ लक्ष्मण आढारी, मो. गौस नदाफ, वासुदेव मुंडे, सुनिल गुट्टे, पोशि/ प्रशांत सैद, तुषार काळे, सुरेश जायभाये, धनाजी शिंदे, सुखदेव गावंडे, गोंविद चव्हाण, यांनी केली आहे.

Hiremath.

(सुधीर हिरेमठ) भा.पो.से
पोलीस उप-आयुक्त, गुन्हे
गुन्हे शाखा, पिंपरी चिंचवड

Scanned with CamScanner